Lilavati Hospital and Research Centre

More than Healthcare, Human Care

पुरोगामी विचाराचे

एकमत

स्पायना बिफीडाची समस्या आणि उपाय

लोकारोग्य

संकलन-संयोजन : सुशीलकुमार गोयल, ९६१९५ ८२८३५

एखाद्या गर्भवती आईच्या गर्भात वाढणाऱ्या बाळाच्या मणक्यात अनेकदा एका किंवा दोन मणक्यांचा विकास होत असतानाच अनेक प्रकारच्या समस्या निर्माण होतात आणि त्यामुळेच गर्भ या काळाही नऊ महिने पूर्ण पट झाल्यानंतर देखील पाणी निघून जाण्याचे आजार मागावतात. या समस्यांपैकी दुर्दैवाने जन्माच्या बाळाच्या जिवाला देखील धोका संभवतो. लहान बालकांच्या बाबतीत अस्तीकरणाच्या विकासाचा एक गंभीर आजार म्हणजे स्पायना बिफीडा. आपल्या देशात सध्याच्या घडीला अनेक मुलांमध्ये स्पायना बिफीडाची लक्षणे पाहायला मिळतात, या ऊतकरावाबत जनमानसात जागृती नसल्यामुळे वेळेवर या आजाराबाबतचे निदान आणि उपचार होत नाहीत. स्पायना बिफीडा या आजाराबाबत मुंबईतील लीलावती हॉस्पिटलचे बालरोग सर्जन विभागाचे सल्लागार डॉ. सतीश करमरकर यांच्याशी केलेली बातचीत.

हॅलो डॉक्टर

स्पायना बिफीडा म्हणजे काय आहे?

स्पायना बिफीडा या आजाराला लहान बालकाच्या पाठीचा मणका आणि मेरुदंड व्यवस्थित विकसित होत नाही. त्यामुळे मुलाच्या विकासात अडचणी येतात. अनेकदा या आजाराबाबत लोकांना माहिती नसल्यामुळे आणि मुलांच्या पालकांची आर्थिक स्थिती बेताची असल्यामुळे या आजाराचे निदान आणि उपचार वेळेवर होत नाहीत, त्यामुळे भविष्यात गुंतागुंत वाढते. हा अनुवांशिक स्वरूपाचा आजार असून गर्भधारणेच्या सुरुवातीला आईमध्ये फॉलिक ॲसिडची कमतरता निर्माण झाल्यामुळे मुलामध्ये हे समस्या उद्भवते.

स्पायना बिफीडा या आजाराची लक्षणे काय आहेत?

स्पायना बिफीडा ही एक अशी स्थिती आहे जी पाठीच्या कण्याला प्रभावित करते आणि वाढीमध्ये अडथळा निर्माण करते. या स्थितीचे निदान होते. हा एक प्रकारचा न्यूरल ट्यूब डिफेक्ट आहे. गर्भधारणेदरम्यान किंवा बाळाच्या जन्मानंतर स्पायना बिफीडा या आजाराचे निदान केले जाऊ शकते. गर्भवती स्त्रियांना अल्ट्रासाउंड, पाण्याची अतिरिक्त वाढ, अशक्ती वेगळे, पायांमधील विकृती, आरोग्याच्या निदान आणि मूत्रशास्त्राच्या समस्या ही स्पायना बिफीडाची लक्षणे आहेत.

स्पायना बिफीडा या आजाराचे किती प्रकार आहेत?

स्पायना बिफीडा हा आजार ३ वेगवेगळ्या प्रकारात दिसून येतो. मायलोमेनिंगोसील हा सर्वात गंभीर प्रकार आहे. यामध्ये मुलाच्या पाठीच्या मागच्या बाजूस पिशवीसारखी नसा बाहेर येतात आणि उघडलेल्या होतात. दुसऱ्या प्रकारच्या स्पायना बिफीडामध्ये मुलाच्या पाठीच्या छिद्राच्या बाहेर हाडाच्या पेशी सामावलेल्या असतो, या स्थितीमध्ये पाठीच्या कण्याचा दरम्यानही भाग समाविष्ट नसतो. मज्जातंतूचे मुळाशी झाल्याने किरकोळ अपंगत्व येते. आणि अखेरचा हा स्पायना राईफिडा असतो. यामध्ये निदान सहसा लहानपणी होत नाही. मात्र या प्रकारचा अपंगत्व येत नाही.

या आजाराचा आजार कसा आहेत?

स्पायना बिफीडा हा आजार आईमध्ये फॉलिक ॲसिडची कमतरता असल्यामुळे होतो. त्यामुळे फॉलिक ॲसिडची कमतरता भरून काढण्यासाठी गर्भवती महिलेचा आहारात सुमारे ४०० ग्रॅम टोमॅटो किंवा संत्राचा रसाचेसा आहारात हवा. संत्र्याच्या शेंगांमध्ये या ॲसिडचे प्रमाण भरपूर आहे. शेंगदाणा पालेभाजी भाजी खाल्ली तर भरपूर प्रमाणात फॉलिक ॲसिड मिळू शकते. विशेष महिलेच्या आहारात अत्यावश्यक जीवनसत्त्व असलेल्या फॉलिक फळांचा वेलीत समावेश असतो. आपल्या देशात दरवर्षी ४०००० पेक्षा जास्त मुले जन्मतः या आजाराह जन्माला येतात. या आजारा संदर्भात जनमानसात जागृती नाही. यासाठीच लीलावती रुग्णालयाच्या बालरोग शस्त्रक्रिया विभागाने स्पायना बिफीडा फाऊंडेशनच्या सहयोगाने ३० जानेवारी रोजी मोफत शिबिराचे आयोजन केले आहे. स्पायना बिफीडाबद्दल समाजात जनजागृती करणे हा या शिबिराचा उद्देश असून या शिबिरात रुग्ण शस्त्रक्रियेच्या शुल्कावर ५० ते १०० टक्के सवलत मिळू शकते.

त्वचेसाठी उपयुक्त चंदन

वनौषधी गुणौषधी

चंदनाचा सुगंध आल्हाद गोकड आहे. संपूर्ण वातावरण त्याच्या सुगंधाने भरून जाते. पूजेत वापरल्या जाणाऱ्या चंदनाच्या उपयोग अनेक आरोग्य सामग्रीवर शतकानुशतके केला जात आहे. त्याचे लाकूड आणि पानांपासून अनेक पदार्थ मिळतात. चंदनाचा वापर प्राचीन काळापासून आयुर्वेदिक औषध म्हणून केला जात आहे. पारंपरिक पद्धतीने उपचारांमध्ये चंदनाचा वापर केला जातो. पण तुम्हाला माहिती आहे का, की चंदन हे आरोग्याच्या दृष्टिकोनातूनही खूप फायदेशीर आहे. त्वचेसंबंधित पोटाचे आजार दूर करण्यासाठी चंदनाचा वापर केला जातो. चंदनाची पाने आणि लाकडाच्या रसामध्ये विशेष पदार्थ असतात. जे पोटाच्या अंतर्गत आजारांवर उपचार करण्यास मदत करतात. काहीजणी अनेक संशोधनेही करण्यात आली आहेत, ज्यामध्ये असे समोर आले आहे की चंदनाच्या लाकडात अनेक संयुगे आढळतात जी पोटाच्या अल्सरवर उपचार करण्यास मदत करतात. चंदन ताप दूर करण्यासाठी देखील खूप फायदेशीर आहे. चंदनाचा केलेल्या संशोधनात असे दिसून आले आहे की त्याचा अँटीपायरेटिक गुणधर्म देखील आहेत, जे शरीराचे तापमान सामान्य पातळीवर आणण्यास मदत करतात. ज्यांना सौम्य ताप आहे त्यांच्यासाठी चंदन फायदेशीर ठरू शकते. चंदनाचा सुगंध खूप मोहक असतो. त्यामुळे तणाव कमी होण्यास मदत होते. याच्या सुगंधाने मानसिक ताण कमी होतो. तुम्ही चंदन पावडर पेस्ट लावू शकता, त्याची पाने वाळवून बारीक करा, त्यानंतर पेस्ट लावून वापरता येईल. चंदनाचा सुगंध आरोग्यदायी म्हणूनही वापरता येतो. चंदन पावडर दुचाकीमध्ये वापरता येते.